# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ C67786 दिनांक : 17 / 6 / 2021

## परिपत्रक

**विषय : भूखंडधारकास पोटभाडयाशुल्कापोटी भरलेली अतिरिक्त रक्कम परत करणे/समायोजित करणेबाबत तसेच हस्तांतरणापोटी तसेच सबलिज पोटी भरलेली रक्कम परत करणेबाबत....**

महामंडळाचे परिपत्रक क्र. ४४ दिनांक ०४.०२.२००८ नुसार औद्योगिक क्षेत्रातील भूखंडधारक ३, ५ किंवा १० वर्षापर्यन्त पोटभाडेशुल्क भरुन परवानगी घेतात परंतु काही कालावधीनंतर भूखंडधारक किंवा पोटभाडेकरु कंपनी त्यांच्या आर्थिक, कामगार अडचणी, काही कायदेशिर बाबीमुळे त्यांना Leave & Licenses करारनामा रद्द करावा लागतो. करारनामा वेळेपूर्वी संपूष्टात आल्यामुळे प्रकरणी उद्योजक पोटभाडयापोटी महामंडळाकडे भरणा केलेली रककम परत करणेबाबत मागणी करत असतात परंतु अशा प्रकरणी पोटभाडेशुल्कापोटी भरणा केलेली रक्कम परत करण्याबाबत महामंडळाचे ठोस असे धोरण नाही

तसेच महामंडळाकडून भूखंडधारक त्यांच्या भूखंडावर सबलीज किंवा हस्तांतरणाकरीता शुल्क भरुन रितसर परवानगी घेतात तथापि काही कारणास्तव त्यांचा प्रस्ताव रद्द झाल्यास उद्योजक महामंडळाकडे त्यांनी हस्तांतर किंवा सबलिज करता भरलेले शुल्क परत करणेबाबत विनंती करतात प्रकरणी महामंडळाचे याबाबत धोरण नसल्याने अशा प्रकरणात शुल्क रक्कम परत करणेबाबतचा विषय संचालक मंडळाच्या दिनांक २९.०४.२०२१ रोजी झालेल्या ३८९ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, ठराव क्र. ६२४२ पारित करण्यात आला.

सदरहू पारित ठरावानुसार महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रातील इमारतीमधील तसेच माहिती तंत्रज्ञान उद्यानामधील इमारतीतील जागा पोटभाडयाने दिल्यानंतर मुदतपूर्व काळात करारनामा संपूष्टात आला तर भूखंडधारकाच्या विनंतीचा विचार करता पोटभाडे शुल्क(GST रक्कम वजा करता) परत करणेबाबत तसेच भूखंडधारकांनी सबलीज, हस्तांतरण परवानगी

महामंडळाकडून घेतली आहे तथापि काही कारणास्तव त्यांचा प्रस्ताव रद्द झाल्यास प्रकरणी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. उद्योजकाकडून पोटभाडे शुल्क परत करणेबाबत विनंती प्राप्त झाल्यानंतर प्रादेशिक कार्यालयाने पोटभाडेकरुने क्षेत्र खाली केल्याबाबत खातरजमा करुन घेणे आवश्यक आहे. याबाबतचा अहवाल दप्तरी दाखल करण्यात यावा.

२. परत करावयाच्या पोटभाडयाची रक्कम ३ महिन्यापेक्षा जास्त असेल तरच ती परत करण्यात यावी किंवा समायोजित करण्यात यावी.

३. रक्कम परत करताना प्रकरणी महामंडळाची इतर कोणतीही देय रक्कम वसूल करावयाची असल्यास ती प्रथमतः वसूल करुन तदनंतर उर्वरित रक्कम परत करण्यात यावी किंवा समायोजित करण्यात यावी.

४. पोटभाडेशुल्का पोटी महामंडळाकडे जमा होणारी रक्कम ही महसूली शिर्षकाखाली वर्ग होत असल्याने सदर रक्कमेचा परतावा महामंडळाच्या दिनांक ०९.१०.२०२० चे परिपत्रक क्र. सी-५३६६३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार करणे आवश्यक राहील. सदर परिपत्रकातील निर्देशानुसार रु. २५.०० लक्ष पर्यन्त मर्यादित रक्कमेच्या परताव्यासाठी सह मु.का.अ. यांची मंजूरी घेणे आवश्यक राहील तर रु. २५.०० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या परताव्यासाठी मु.का.अ., मऔविम यांची मंजूरी घेणे आवश्यक राहील.

५. वस्तू व सेवा शुल्काच्या रक्कमेचा भरणा महामंडळामार्फत वेळोवेळी कोषागाराकडे करण्यात येत असल्यामुळे पोटभाडे शुल्कापोटी परत करावयाची रक्कम वस्तु व सेवा शुल्काची रक्कम वगळून परत केली जाईल.

६. ज्या भूखंडधारकांनी सबलीज, हस्तांतरण परवानगी महामंडळाकडून घेतलेली आहे तथापि सदरहू कालावधीमध्ये काही कारणास्तव त्यांचा प्रस्ताव रद्द झाल्यास व प्रकरणी त्यांनी महामंडळास विनंती

केल्यास त्यांच्याकडून ना परतीची प्रक्रिया शुल्क(२०००० चौ.मी क्षेत्र व त्यावरील भूखंडाकरीता रु. १००००/- व २०००० चौ.मी. क्षेत्राखालील भूखंडाकरीता रु. ५०००/- ) वसूल करुन सबलीज, हस्तांतर पोटी भरलेली रक्कम परत करण्यात यावी.

७. उपरोक्त अटी व्यतिरिक्त प्रकरणी इतर अटी व शर्ती निश्चित करण्याचे अधिकार मुकाअ यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(अभिषेक कृष्णा)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई